महाराष्ट्र शासन

सेवाव्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),
६०४ शेंडापार्क, आर.के.नगररोड, कोल्हापूर—४१६०१२.

दुरध्वनीक्रमांक :- (०२३१)२६९२३५१ | e-mail – smdw.kop@gmail.com

जा.क्र/विकाको/तांत्रिक/टायर दरपत्रक/1203/२०२६, दिनांक :- १२/११/२०२६.

प्रति,

मा.सहसंचालक,आरोग्य सेवा
(खरेदीकक्ष)१ ला मजला ,
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई.

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत कोल्हापुर मंडळाअंर्तगत सांगली जिल्हयातील प्रा.आ. केंद्र ढालगाव जि. सांगली येथील आरोग्य संस्थेत कार्यरत रुग्णालयीन वापरातील (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहिका एम एच १० सी. आर ८७२८ या वाहनाचे टायरचे दरपत्रक विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ:-१) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/ प्र.क्र ८२/भागIII/उदयोग-४/ दिनांक ३०/१०/२०१५.

महोदय,

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/ प्र.क्र ८२/भागIII/उदयोग-४ दिनांक ३० ऑक्टोंबर २०१५, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तीका मधील परिच्छेदक्र. ४.२ मधील निर्देशानुसार दरपत्रकावर खरेदी करावयाच्या खरेदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून दरपत्रक सादर करण्यास कार्यालयीन कामाचे आठ दिवसाचा कालावधी देण्यात यावा असे निर्देशित केलेले आहे.

या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येत आहे की, या कार्यालयाकडून आरोग्य विभाग, कोल्हापुर मंडळाअंतर्गत सांगली जिल्हयातील प्रा.आ. केंद्र ढालगाव जि.सांगली येथील आरोग्य संस्थेत कार्यरत रुग्णालयीन वापरातील (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहिका एम. एच.१० सी.आर ८७२८ या वाहनाचे टायरचे दरपत्रक सादर करणेबाबतची, दरपत्रकाची नोटीस (जाहिरसूचना) नमूने सोबत जोडून सादर करण्यात येत आहेत. सदर नोटीस दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही सविनय विनंती.

सोबत:- दरपत्रकांची नोटीस (जाहिर सूचना) नमूना.

12/11/26.

सेवा व्यवस्थापक,
विभागीय कार्यशाळा
आरोग्य सेवा(परिवहन), कोल्हापूर

महाराष्ट्र शासन

सेवाव्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),
६०४ शेंडापार्क, आर.के.नगररोड, कोल्हापूर—४१६०१२.

दुरध्वनीक्रमांक :- (०२३१)२६९२३५१ | e-mail – smdw.kop@gmail.com

जा.क्र/विकाको/तांत्रिक/टायर दरपत्रक/ 1208 /२०२६, दिनांक :-१२/११/२०२६.

प्रति,

.....
.....
.....

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत कोल्हापुर मंडळाअंर्तगत सांगली जिल्हयातील प्रा.आ. केंद्र ढालगाव जि. सांगली येथील आरोग्य संस्थेत कार्यरत रुग्णालयीन वापरातील (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहिका एम एच १० सी. आर.८७२८ या वाहनाचे टायर चे दरपत्रक विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कोल्हापुर मंडळाअंतर्गत सांगली जिल्हयातील प्रा. आ. केंद्र ढालगाव जि.सांगली येथील आरोग्य संस्थेत कार्यरत रुग्णालयीन वापरातील (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहिका एम एच १० सी.आर.८७२८(फोर्स ट्रॅव्हलर) वाहनांचे खालील प्रपत्रात नमूद केलेप्रमाणे टायरची आवश्यकता आहेत. यानुसार प्रस्तुत बाबींचे सर्व करांसह दर या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहेत. सदर सर्व करसमावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेड वर दिनांक २५/११/२०२६ रोजी दुपारी ३.०० पर्यत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर " सार्वजनिक आरोग्य विभाग,कोल्हापुर मंडळाअंतर्गत, प्रा.आ. केंद्र ढालगाव जि. सांगली येथील आरोग्य संस्थेत कार्यरत रुग्णालयीन वापरातील (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहिका एम.एच.१० सी.आर.८७२८" असा स्पष्ट उल्लेख करावा.

-प्रपत्र-

अ.क्र	वाहनाचा तपशील	टायरचा तपशील	दर
१	फोर्स ट्रॅव्हलर रुग्णवाहिका	215/75 R 15 LT (Tubless)	

दरपत्रके सादर करण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाण:

अ.क्र	तपशील	कालावधी
१	या कार्यालयाचे सूचनाफलकावर दरपत्रके सादर करणेसाठीचा नमुना प्रपत्र उपलब्ध असणे.	दि. १२/११/२०२६ ते २५/११/२०२६ वेळ दु.३.००पर्यत
२	दरपत्रके सादर करण्यासाठीची मुदत	दि. १२/११/२०२६ ते २५/११/२०२६ वेळ दु.३.००पर्यत
३	दरपत्रक सादर करावयाचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा परिवहन, शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

दरपत्रक उघडण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाणः

अ.क्र	तपशील	कालावधी
१	दरपत्रक उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ	दि. २५/११/२०२६ वेळ दु.४.०० पर्यत.
२	दरपत्रक उघडण्याचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

वरील प्रमाणे दरपत्रके उघडण्याच्या दिवशी दरपत्रके सादर केलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींस समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दरपत्रके सादर करणे बाबतच्या अटी व शर्ती :-

१) सदर सेवा पुरवठादार संस्था ही प्रपत्रात नमूद टायरसाठी अधिकृत असावी, सोबत शॉपॲक्ट / फॅक्टरी ॲक्ट लायसन्स सादर करावे.
२) एका संस्थेने एकल दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. सोबत खालीलप्रमाणे "विहीत प्रपत्र.अ,"सेवा/खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधाचा संबध नसल्याबाबत आणि एकल दरपत्रक देण्याबाबत दरपत्रकाराची "हमीपत्र" सोबत जोडणे आवश्यक आहे.
३) दरपत्रक संस्थेच्या लेटरहेडवरच सही व शिक्क्यासह सादर करावे, तसेच त्यावर GST क्रमांक नमूद करण्यात यावा. सोबत GST प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
४) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.
५) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.
६) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे किरकोळ विक्री किमती पेक्षा (एम.आर.पी.) जास्त नसावेत तसेच सर्व संभाव्य खर्चासह आणि करांसह असावेत.
७) सदर कामकाजासाठी फक्त कोल्हापूर शहरातील स्थानिक टायर्स विक्रेते यांचा विचार करण्यात येईल.
८) विहीत नमुन्यात सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
९) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
१०) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल..
११) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), कोल्हापूर यांचा राहील.

13/11/26

सेवा व्यवस्थापक,
विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा,(परिवहन), कोल्हापूर.

Website Document Upload Form (WDU)

Name of Program	**Health Services (Transport)**
Name & Designation of Officer	Mr. Digamber S.Kamble, Service Manager, Divisional Workshop, Kolhapur.
Date of Publication	12-11-2026
Displayed on Website (Please tick checkbox)	www.arogya.maharashtra.gov.in
Published on section/Tab of Website	Tender - Other than DHS
Document Title should be displeyed as (in Marathi)	सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कोल्हापूर मंडळातील सांगली जिल्ह्यातील प्रा. आ. केंद्र ढालगाव , ता.कवटे महाकाळ येथील रुग्णालयीन वापरातील रुग्णवाहिका क्र. एम.एच. १० सी .आर . ८७२८ (फोर्स ट्रॅव्हलर) रुग्णवाहीकाचे टायर्सचे दरपत्रक सादर करणे बाबत.
Document Title should be displeyed as (in English)	Regarding submission of Tyres quotations for Ambulance (Force Traveller) Vehicle for Hospital Used in Kolhapur Circle,District Sangli, PHC Dhalgaon, Tal- Kavate Mahakal.
Document Size (Document should be in PDF format and Size will not exceed more than 10MB)	

Declaration

I hereby declare that all information provided in this website document upload form (WDU) for the purpose of uploading/updating document on website only and correct to the best of my knowledge. All documents resposibility will be on concern program department only; IT NHM department is not responsible for any breach cause to content of uploaded documents. IT NHM department is resposible only for uploading/updating documents on website.

Date :- 12 / 11 / 2026.

Service Manager Divisional Workshop, Kolhapur.